FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

0167737

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ए.सी.बी., पहिली खबर क्र. FIR No. 10/2020, वर्ष Year ..........., दिनांक Date 10/02/2020

2. (i) अधिनियम Act प्र.भ्र. अधिनियम-१९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ..............................., कलमे Sections ..............................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ..............................

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from 10/02/2020, वेळ Time ..........., तारीख पर्यंत Date to 10/02/2020, वेळ Time 14.12

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 10/02/2020 वेळ Time 10.30 वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 24/2020 तारीख Date 10/2/2020 वेळ Time 13.24

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral ..............................

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा पूर्वेस ६ कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ..............................
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No. दादर रेल्वे स्टेशन, बीट नं. ०५
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name दादर स्टेशन, ठिकाणाचे नंबर No. if any ..............., गल्ली Ward ..............., रस्त्याचे नांव Name of road ...............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifia दादर, गाव Village ..............., पोस्ट Post ..............., तालुका Taluka ..............., जिल्हा Dist. मुंबई, राज्य State ...............
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..............................., तालुका Taluka ..............., जिल्हा Dist. ..............., राज्य State ...............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name आतीष कामथे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name लक्ष्मण कामथे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 39 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ...............
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..............., दिल्याचा दिनांक Date of Issue ..............., दिल्याचे ठिकाण Place of Issue ..............., (f) व्यवसाय Occupation ...............
   (g) धर्म Religion ..............., जात Caste ..............., जनजात Sub-Caste ...............
   (h) पत्ता Address : भिमाशंकर पार्क ३, सोसायटी, रुम नं. ०६, धोबीघाट, पांडुरंग वाडी, घाटकोपर (प), मुंबई-०२
   गल्ली / सर्व्हे नं. Ward ..............., घर / नावे नं. House/Name No. ..............., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..............., पॅन नं. PAN No. ..............., कार्ड नं Card No. ...............
   रस्त्याचे नाव Road ..............., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..............., गाव Village ..............., पोस्ट Post ..............., पो. स्टे. P Stn. ...............
   तालुका Taluka ..............., जिल्हा Dist. ..............., राज्य State ..............., सध्याचा पत्ता Present Address ...............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असलेल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   विजय शंकर देवरे वय 32 वर्षे सहायक केंद्र अधिकारी रोजगार विभाग दादर (प) मुंबई



Scanned with CamScanner

N.C.R.B.
I.I.F.-I

फिर्यादीचा जबाब दि. १८/०२/२०२०

फिर्यादी श्री. अनिल लक्ष्मण कामथे वय ३७ वर्षे यांनी आरोपी लोकसेवक विजय प्रकाश देवरे वय ३९ वर्षे नोकरी सहाय्यक केंद्र अधिकारी जी/दक्षिण विभाग मुंबई यांचेविरुद्ध दिलेल्या तक्रारीबाबत स्वतंत्र कागदावर सविस्तर जबाब नोंद करण्यात आला असून, तीच गुन्ह्याची फिर्याद म्हणून समजण्यात यावी.

समक्ष
[signature]
(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

[signature]
18/2/2020

दिनांक १७/०२/२०२०

फिर्याद

श्री. अनिल लक्ष्मण कामथे, वय ३१ वर्षे, धंदा– नोकरी, रा.ठि– भिमाशंकर वारकरी सोसायटी, रुम नं. ६, धोबी घाट पाईप लाईन, असल्फा व्हिलेज, घाटकोपर (पश्चिम), मुंबई– ४०००७२ मो.नं. ८०९७७२४०१४

–––ooo–––

मी वर नमूद केल्याप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी पत्नी सौ. किर्ती कामथे, मुलगी कुमारी योगीता, १० वर्षे, मुलगा कुमार वरुन ७वर्षे यांचेसह गेल्या दहा वर्षापासुन राहत आहे. मी तुर्भे, नवी मुंबई येथे आल्फा प्लस या कंपनीमध्ये पत्ता– ई.टी.सी. इंडस्ट्रीज, डी–२८५, तुर्भे नाका, मेडिसीन कंपनी जवळ, तुर्भे, नवी मुंबई येथे कॉम्पूटर ऑपरेटर म्हणून नोकरी करतो.

मला माझे नोकरी बरोबरच वडा–पाव व भजी विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी मी डॉ. श्री. आडवीलकर यांचे बिल्डींग नं. ४, क्षेत्रपार्लेश्वर बिल्डींग, ऋषी वाल्मीकी रोड, माटुंगा लेबर कॅम्प, शाहु नगर, माहिम (पूर्व), मुंबई येथील गाळा भाडयाने घेतला आहे. सदर गाळयामध्ये मी वडा–पाव विक्रीचा व्यवसाय चालू केला आहे. सदर व्यवसायासाठी गुमास्था लायसन्स काढलेले असुन हेल्थ व फायरचे लायसन्स लागत असल्याने बी.एम.सी. जी/नॉर्थ, दादर, मुंबई येथे दिनांक ०७/०२/२०२० रोजी जावून हेल्थ लायसनसाठी श्री. म्हात्रे यांना भेटलो असता त्यांनी लायसन्ससाठी लागणारी कागदपत्रे सांगितली व सदर कागदपत्रांची पुर्तता केल्या नंतर लायसन्स देता येईल असे सांगितले. त्यानंतर फायर लायसन्स मिळविण्यासाठी सदर कार्यालयातील श्री. देवरे साहेब फायर ऑफीसर यांना भेटून फायर लायसन्सबाबत विचारणा करुन माहिती घेतली असता श्री. देवरे साहेब यांनी व्यवसायाची जागा ही लहान असल्याने तुला फायर लायसन्स देता येणार नाही. तु मला रु. ५०००/– दे व व्यवसाय चालू ठेव असे सांगून माझा मोबाईल क्रमांक त्यांनी लिहून घेतला व सदरची रक्कम घेवून दिनांक १०/०२/२०२० रोजी त्यांच्या कार्यालयास येण्यास सांगितले होते. मी नमुद तारखेस न गेल्याने दिनांक १५/०२/२०२० रोजी दुपारचे वेळी श्री. देवरे साहेब यांनी माझे मोबाईल फोनवर संपर्क करुन मागणी प्रमाणे पैसे घेवून येण्यास सांगितले. सदर वेळी मी त्यांना दिनांक १७/०२/२०२० रोजी पैसे घेवून येतो असे सांगितले.

श्री. देवरे साहेब फायर ऑफीसर यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १७/०२/२०२० रोजी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. कालेकर व पोलीस निरीक्षक कानडे यांच्याकडे माझी श्री देवरे यांच्याविरूदध लेखी तक्रार दिली.

पोलीस निरीक्षक श्री. कानडे यांनी माझ्या तक्रारीची पडताळणी दोन शासकिय पंचांसमक्ष करण्यात येईल असे सांगून, शासकीय पंच ब्युरो कार्यालयात हजर होताच पडताळणी करण्याकरिता पंचासह श्री. देवरे यांचे कार्यालयात जावून भेटण्याबाबत मला सांगितले. पंच कार्यालयात हजर झाले नंतर पो.नि. कानडे यांनी पंच श्री. संदेश रामस्वामी लोकरे व श्री. अशोक रमेश विधाते यांची मला ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांना माझा अर्ज पंचाना वाचण्यास दिला. त्यांनी माझा अर्ज वाचून त्याचेवर स्वाक्षरी केली त्यानंतर पो.नि. कानडे यांनी सदर अर्जावर समक्ष म्हणून स्वाक्षरी केली. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये पोलीस अंमलदार सहभागी होणार असून सापळा पथकात भाग घेणाऱ्या पोलीस पथकातील अंमलदारांची ओळख

Scanned with CamScanner

करुन दिली व कारवाईत सहभागी होणाऱ्या दोन शासकिय वाहनावरील चा ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. कानडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे, तक्ररीची पडताळणी करण्यासाठी ब्युरो कार्यालयातून दोन शासकिय वाहनाने पंच व पोलीस पथक रवाना झालो. आम्ही तक्षशिला सोसायटी, भिकोबा वामन पाठारे मार्ग, दादर मुंबई येथे थांबलो. तेथे माझे शर्टाचे आतमध्ये बनीयनला पो.नि. कानडे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावले व मला पंच श्री. संदेश लोकरे यांच्याबरोबर काही अंतर ठेवुन श्री. देवरे साहेब यांना भेटण्याकरिता त्यांचे कार्यालयात पाठविले. आम्ही कार्यालयात गेलो असता श्री. देवरे भेटले. त्यांना कामाबद्दल विचारणा केली तसेच माझी रु. ५०००/– एवढी रक्कम देण्याची माझी ऐपत नसल्याने त्याना सांगीतले असता त्यांनी हाथाच्या चार बोटाच्या इशाऱ्याने रु. ४०००/– देण्याचा इशारा केला. याबाबत मी बोलून खात्री केली असता त्यांनी हाय काय येथे अशी विचारणा केली असता मी अर्ध्या तासात दुकानातुन घेवुन येतो असे सांगितले असता त्यांनी साडेचार वाजेपर्यत परत कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. लोकरे सरकारी वाहन जेथे थांबली होती तेथे परत आलो.

शासकिय वाहनात आल्यानंतर पो.नि कानडे यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले व झालेल्या घटनेची माहिती माझेकडून व पंच श्री. लोकरे यांचेकडून ऐकली त्यानंतर डिजिटल व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकून घेत असतानाच श्री. देवरे यांनी माझे मोबाईल फोनवर संपर्क करुन तु अद्याप पर्यत आला नाहीस अशी विचारणा केली. तेव्हा मी त्यांना सांगितली की, माझी दोन हजार रुपयाची तयारी झाली आहे. तेव्हा देवरे बोलले की फोनवर असे बोलायचे नाही त्यानंतर मी देवरे यांना सांगितले की आणखी दोन हजार रुपये भावाकडून घेतो असे मिळुन चार हजार रूपये घेवुन येतो. तेव्हा त्यांनी ''मला नको ते'' असे सांगून फोन कट केला. कांही वेळा नंतर मी श्री. देवरे यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला व माफी मागितली असता त्यांनी मला दादर रेल्वे स्थानक प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर पैसे घेवून येण्यास सांगितले. श्री. देवरे यांनी पैशाची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने पो.नि. कानडे यांनी मला व पंचांना माहिति दिली की, श्री. देवरे यांनी मागणी केलेल्या नोटांना ॲथ्रेसिन पावडर लावण्यात येणार असून सदर नोटा श्री. देवरे यांना देण्यात येतील असे सांगून पंचा समक्ष ॲथ्रेसिन पावडरचे गुणधर्म सांगितले व विज प्रवाह उपलब्ध्द नसल्याचे प्रात्यक्षिक दाखविले नाही.

त्यानंतर सापळा कारवाईचे आयोजन केले व माझेकडील रु. ५००/– च्या भारतीय चलनाच्या ८ नोटा माझेकडून घेवून सापळा कारवाईतील चालक श्री. जामसांडेकर यांचे मार्फतीने सदर नोटांना ॲथ्रेसिन पावडर लावली व ते कारवाईत भाग घेणार नसल्याचे सांगून त्यांचे मार्फतीने सदर नोटा माझे शर्टाचे वरच्या खिशात ठेवल्या. तसेच पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे शर्टाचे आतमध्ये बनियनला लावले. त्यानंतर मी श्री. देवरे यांना भेटण्यासाठी पंच श्री. संदेश लोकरे यांचेसह दादर मध्य रेल्वे प्लॅट फॉर्म क्रमांक ५ येथे जाणेस निघालो माझे पाठोपाठ पोनि कानडे, सपोआ कालेकर व सापळा पथकातील अंमलदार कांही अंतराने होते. मी दादर रेल्वे जिन्यावर असताना श्री. देवरे प्लॅट फॉर्म क्रमांक ५ वर नक्की कोठे उभे आहेत याबाबत त्यांचे मोबाईल फोनवर संपर्क करुन विचारणा केली असता त्यांनी प्लॅटफॉर्म क्रमांक ५वर उतरण्याचे जिना आहे त्याचे जवळ असल्याचे सांगितले. त्यानुसार मी व काही अंतर ठेवुन असलेले पंच श्री. लोकरे प्लॅटफॉर्मवर गेलो असता श्री. देवरे तेथे मला भेटले. त्यांनी पैशाची विचारणा केली असता माझे शर्टाच्या

Scanned with CamScanner

डाव्याबाजूच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु. ४०००/— उजव्या हाताने काढले व त्यांचे समोर केले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढच्या उजव्या खिशात ठेवले. श्री. देवरे यांनी पैसे स्विकारल्याबाबत मला सांगितल्या प्रमाणे सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना समजण्यासाठी पुर्वनियोजित इशारा म्हणुन मी माझा डावा हाथ डोक्याच्या केसावरून फिरवून इशारा केला असता सापळा पथकाने श्री. देवरे यांना ताब्यात घेतले. दरम्यान माझे शर्टाचे आतमध्ये बनियनला लावलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.नि. कानडे यांनी काढून बंद करुन ताब्यात घेतला.

श्री. देवरे यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत. तसेचं श्री. देवरे यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझे बचतीतुन आणलेली आहे. तरी श्री. देवरे यांनी माझे वडा—पाव विक्रीचे व्यवसायासाठी फायर लायसन्स न देता व्यवसाय चालू ठेवण्यासाठी रु. ५०००/— ची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. ४०००/— इतक्या लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले व ती आज रोजी स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत करुन तो मी वाचुन पाहिला सदर जबाब माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( गणेश म. कानडे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

FORM

सत्यमेव जयते MUMBAI ...RRUPTION BUREAU

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ......नाविलंब......
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......—......
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......—......
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आरोपीत इसमाने फिर्यादी यांचेकडे वडापाव/अंडी व्यवसायाकरीता कायदेशीर लायसन्सची आवश्यकता असल्याचे सांगितले व विनापरवाना व्यवसाय चालू ठेवण्याकरीता आलोसे यांनी रु. 5000/- लाचेची रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती आपण कारवाई दरम्यान रु. 3000/- लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
......गणेश कानडे पोलीस निरीक्षक......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..............................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)............ Rank............ No............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to............ (3) Transferred to P. S. ............ District............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)
[signature] 18/2/2020

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ......गणेश कानडे......
पदनाम Rank......पोलीस निरीक्षक......
तपासिक अं. चा कोड क्र. ..............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..............
1. Date and time of submitted to the Court.

Posting
Code No. of I. O. ..............

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner